**दिनांक ०९.०८.२००८**

**प्रति,**
**मा. प्राचार्य,**
**सर्व संलग्न महाविद्यालये,**
**पुणे विद्यापीठ,**
**पुणे ४११००७.**

**महोदय/महोदया,**

पुणे विद्यापीठाच्या विद्याप्रबोधिनीमार्फत (Academic Staff College) शिक्षकेतर सेवकांसाठी विविध प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले जाते. गेल्या वर्षभरात या उपक्रमाअंतर्गत विद्यापीठातील वर्ग-१ पासून वर्ग-४ पर्यंतच्या सर्व स्तरातील सेवकांसाठी व्यक्तिमत्व विकास (Soft Skills Development Programme), इंग्रजी संभाषण कला, संगणक प्राविण्य, जगणे आंनदी कसे करावे? इत्यादी विषयावरील प्रशिक्षण वर्ग राबविले गेले. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील व विद्यापीठातील प्रयोगशाळांमध्ये काम करणा-या सेवकांसाठी "प्रयोगशाळा सुरक्षितता" या विषयावर कार्यशाळा आयोजित केल्या गेल्या.

वर नमूद केलेले प्रशिक्षण वर्ग विद्यापीठातील सेवकांसाठी यशस्वीपणे राबविल्यानंतर सदरचे सर्व प्रशिक्षण वर्ग महाविद्यालयातील शिक्षकेतर सेवकांसाठी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यापीठाच्या सहाय्याने अशा प्रकारचा अभिनव उपक्रम संपूर्ण देशामध्ये पहिल्यांदाच विद्याप्रबोधिनीने हाती घेतला आहे. **या प्रशिक्षण वर्गांचा शिक्षकेतर सेवकांना त्यांच्या व्यक्तिगत विकासासाठी तसेच कार्यक्षमता वाढवून महाविद्यालयातील जबाबदारी अधिक प्रभावीपणे व परिणामकारकरित्या पार पाडण्यासाठी होऊ शकतो.**

**सदर प्रशिक्षण वर्ग विद्याप्रबोधिनीमार्फत विनामूल्य आयोजित केले जाणार असून प्रशिक्षण कालावधीत शिक्षकेतर सेवकांना "कर्तव्य रजा" (Duty Leave) मंजूर करून द्यावी. प्रशिक्षण कालावधीत सहभागी सेवकांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था व खर्च विद्यापीठामार्फत केला जाईल. तथापि, प्रशिक्षण वर्गात सहभागी होणा-या सेवकांचा प्रवासखर्च संबंधित महाविद्यालयाने करणे अपेक्षित आहे.**

**विद्याप्रबोधिनीमार्फत आयोजित केल्या जाणा-या २ ते ६ दिवसांच्या कालावधीच्या प्रशिक्षण वर्गाची यादी व त्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना या पत्रासोबत जोडला आहे. आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास तो आणून द्यावा व विविध प्रशिक्षण वर्गांमध्ये सहभागी होण्यासाठी त्यांना प्रोत्साहीत करून त्यांचे पूर्ण भरलेले प्रवेश अर्ज या विभागाकडे त्वरीत पाठवून द्यावेत**. यापुढे वर्षभर हे प्रशिक्षण वर्ग सातत्याने राबविण्यात येणार असून आपणास व संबंधित शिक्षकेतर सेवकांना त्यांच्या प्रशिक्षण वर्गात सहभागाच्या निवडीविषयी नंतर कळविण्यात येईल. **विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांची गुणवत्ता/कार्यक्षमता वाढविण्यासाठी आपले सक्रिय सहकार्य अपेक्षित आहे.**

यासंदर्भात इतर काही माहिती हवी असल्यास श्री सचिन सुर्वे, कक्षाधिकारी यांचेशी २५६०११५२ व २५६९२०२२ किंवा ९८५०६२८९४४ या दूरध्वनी क्रमाकांवर संपर्क साधावा.

कळावे,

आपला विश्वासू,

**डॉ. ज्ञान पाटील**
**संचालक**

**सोबत :**

1. **प्रशिक्षण वर्गांची यादी**
2. **अर्जाचा नमुना**

विद्याप्रबोधिनी
पुणे विद्यापीठ
पुणे ४११००७.

## प्रशिक्षण वर्गांची यादी

| अ.क्र. | प्रशिक्षण वर्गाचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १ | व्यक्तिमत्व विकास वर्ग (Soft Skills Development Programme)<br>वर्ग-१ सेवकांसाठी | ६ दिवस |
| २ | व्यक्तिमत्व विकास वर्ग (Soft Skills Development Programme)<br>वर्ग-२ सेवकांसाठी | ६ दिवस |
| ३ | व्यक्तिमत्व विकास वर्ग (Soft Skills Development Programme)<br>वर्ग-३ सेवकांसाठी | ६ दिवस |
| ४ | इंगजी संभाषण (Conversational English)<br>वर्ग-१ सेवकांसाठी | ६ दिवस |
| ५ | इंगजी संभाषण (Conversational English)<br>वर्ग-२ सेवकांसाठी | ६ दिवस |
| ६ | इंगजी संभाषण (Conversational English)<br>वर्ग-३ सेवकांसाठी | ६ दिवस |
| ७ | संगणक प्रशिक्षण वर्ग (Computer Training Programme)<br>वर्ग-१ सेवकांसाठी | ६ दिवस |
| ८ | संगणक प्रशिक्षण वर्ग (Computer Training Programme)<br>वर्ग-२ सेवकांसाठी | ६ दिवस |
| ९ | संगणक प्रशिक्षण वर्ग (Computer Training Programme)<br>वर्ग-३ सेवकांसाठी | ६ दिवस |
| १० | जगणे आंनदी कसे करावे?<br>वर्ग-४ सेवकांसाठी | ६ दिवस |
| ११ | प्रयोगशाळा सुरक्षिततेविषयी प्रशिक्षण वर्ग (Laboratory Safety)<br>प्रयोगशाळा सहाय्यकांसाठी | २ दिवस |

**डॉ. ज्ञान पाटील**
**संचालक**

**विद्याप्रबोधिनी**
**पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७.**

---

_______________________ **प्रशिक्षण वर्गासाठी अर्ज ***

१. सेवकाचे नाव : ________________

२. पदनाम/हुद्दा : ________________

३. जन्मतारीख : ________________

४. शैक्षणिक अर्हता : ________________

५. दूरध्वनी क्र./मोबाईल क्र. : ________________

६. महाविद्यालयाचा/सेवकाचा ई-मेल : ________________

७. संस्थेचे नाव : ________________

८. महाविद्यालयाचे नाव व पत्ता : ________________

९. महाविद्यालयाचा दूरध्वनी क्र. : ________________

१०. नोकरीचा एकूण कालावधी (वर्ष) : ________________

११. इतर शैक्षणिक अर्हता : ________________

दिनांक : स्वाक्षरी

---

*** अर्जदारानी प्रशिक्षण वर्गाचे नाव लिहीणे जरूरीचे आहे.**

प्राचार्यांची शिफारस

____________________________________________

____________________________________________

**प्राचार्यांची सही व शिक्का**